क्र.हो/कार्या. २/२.३/१५/३. ७०६
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे
कार्यालय, बी. एम. आर. डी. ए. इमारत,
२ रा मजला, बांद्रे [पूर्व] मुंबई ४०००५१
दिनांक: १८-२-९२

वाचले:

१] शासन, महसूल व वन विभाग ज्ञापन क्र. एसएनडी. २२५९/७७०३२/३, दि. ३०.८.६१.

२] शासन, महसूल व वन विभाग ज्ञापन क्र. एसएनडी. २२५९/७७०३२/३, दि. १२.३.६२.

३] शासन, महसूल व वन विभाग निर्णय क्र. एसआरएफ. २६६४/११०२२१/१ बी, दि. १०.८.६४.

४] शासन, महसूल व वन विभाग पत्र क्र. एसएनडी. २८८५/२६६८८/पु.क्र. ७७४४/ग.६ दि. २०.२.८९;

५] गाडगे महाराज विद्यालय यांचे पत्र क्र. पी. ५/४२५/१९९०, दि. ३०.११.९०.

आदेश

मौजे कुर्ला एल.एल. स्किम पैकी महानंदा स्कूल यांना भाडेपट्ट्याने मंजूर झालेल्या प्लॉट क्र. "ए" ते "जे" मधील प्लॉट सी, डी, ई, एफ, जी, एच, आणि जे, त्यांनी शर्तभंग केल्याने उपोद्घातात अ.क्र. १ व २ मध्ये नमूद केलेल्या दि. ३०.८.६१ व १२.३.६२ महसूल विभागाच्या ज्ञापनान्वये शासनाकडे पुनर्ग्रहित करण्यात आले होते. वरील सर्व भूखंड ["सी" ते "जे"] शासनाकडे पुनर्ग्रहित करण्यात आल्यानंतर देखील शासन ज्ञापन दिनांक ३०.८.६१ मधील परिच्छेद ३ मध्ये निदेश दिल्याप्रमाणे पुनर्ग्रहित करण्यात आलेल्या भूखंडापैकी "ई" भूखंडावर गाडगे महाराज मिशन यांची वसती-गृहाची पक्की इमारत असल्याने शासन ज्ञापनाप्रमाणे तो अभिलेखी शासन जमा झाला परंतु तो भूखंड गाडगे महाराज मिशन यांना भाडेपट्ट्याने देण्याचे धोरण त्याच ज्ञापनांत स्पष्ट केल्याने व याबाबतच्या कार्यवाहीला शासनाने दि. १२.५.६२ च्या पत्राने स्थगिती दिल्याने त्याचा प्रत्यक्ष ताबा घेण्यात आलेला नाही.

२. मौजे कुर्ला एल.एल. स्किम १७ पैकी जे,"सी,"डी,"ई, एफ, जी, एच आणि जे हे भूखंड महानंदा स्कूलकडून शर्तभंगामुळे पुनर्ग्रहित करण्यात आले



Scanned by CamScanner

होते त्या भूखंडापैकी, "एफ" "जी", "एच", "जे" हे भूखंड गाडगे महाराज मिशन यांना शैक्षणिक प्रयोजनासाठी कब्जाहक्काने प्रदान करण्यात आले आहेत. शासनाने गाडगे महाराज मिशन यांना प्रदान करण्यात आलेल्या भूखंडाबाबत माहिती सादर करणेबाबत जिल्हा निरिक्षक भूमि अभिलेख यांना या कार्यालयाचे पत्र क्र. सी/कार्या. १/जमिन. १. जे/सीआर. ६६/८५ दि. १८. ८. ८७ संदर्भात त्यांच्याकडून एस. एस. फिरका १७ मौजे घुर्ला मधील प्रदान करण्यात आलेल्या भूखंडाबाबत सद्यस्थिती व अतिक्रमण याबाबतचा अहवाल मागविण्यात आला होता. त्याबाबत जिल्हा निरिक्षक भूमि अभिलेख, मु. उ. जि. यांनी त्यांचा अहवाल मो. र. न. २४१/८७ दि. २०. १०. ८७ अन्वये या कार्यालयास सादर केला. सदर अहवालात गाडगे महाराज मिशन यांना शासनाने एफ, जी, एच, जे, भूखंड मंजूर झालेले असताना त्यांच्या प्रत्यक्ष ताब्यात भूखंड ई पैकी, ५०४.० चौ. मी., डी पैकी, २२६.९ चौ. मी., एफ- ६३०.० चौ. मी., जी- ५५.१ चौ. मी. न. भू. क्र. ५०३पै. ४२६.५ चौ. मी. असे एकूण १८४२.५ चौ. मी. क्षेत्र आहे. म्हणजे मंजूर झालेल्या क्षेत्रापैकी "एफ" संपूर्ण भूखंड तसेच "जी" भूखंडापैकी ५५.१ चौ. मी. अधिकृत क्षेत्र ताब्यात आहे व बाकीचे सर्व त्यांनी केलेले अतिक्रमण आहे. याबाबत वस्तुस्थितीचा अहवाल या कार्यालयाचे पत्र क्र. सी/कार्या. १/जमिन. १/सीआर. ६६/८५, दिनांक १९. ११. ८७ अन्वये सादर करण्यात आला होता.

३. या कार्यालयाच्या वरील अहवालाच्या अनुषंगाने शासन, महसूल व वन विभाग यांनी त्यांचे क्र. एलएनडी. २६८५/९६४८८/प्र. क्र. ७०४४/ग-६ दि. २०. २. ८९ च्या पत्राच्या परिच्छेद १ मधील [क] अन्वये गाडगे महाराज मिशनच्या वापरात नसलेले "एच" आणि "जे" भूखंड व तसेच "जी" भूखंडापैकी ५५.१ चौ. मी. जागा सोडून उर्वरित क्षेत्र पुनर्ग्रहित करून शासन जमा करण्यात यावे. याबाबतच्या कार्यालयाचे पत्र क्र. सी/४५/२. जे/सी. २६ दि. २५. ९. ९० अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. याबाबत संस्थेने त्यांचा खुलासा त्यांचे पत्र क्र. जी. ५/४२५/१९९० दिनांक ३०. ११. ९० अन्वये सादर केला आहे. त्यांनी दिलेल्या खुलाशावरून हे जिल्हा निरिक्षक भूमि अभिलेख यांनी याबाबत सादर केलेल्या अहवालाशी सहमत असल्याचे दिसून येते. तसेच भूखंड "जी" पैकी जी ५५.१ चौ. मी. जागा



Scanned by CamScanner

मोकळी आहे ती उपयोगात न आणता येणारी आहे असे म्हटले असून त्या येथाचा वर्ग निःशुल्क उपयोगात आणत आहे असे कळविले आहे. संस्थेच्या नांवे शासन अभिलेखी जरी जागा असली तरी ती त्यांच्या प्रत्यक्ष ताब्यात नसल्याने ती संस्थेकडून काढून घेण्यास पात्र ठरत आहे.

४. वरील सर्व परिस्थिती लक्षात घेता उपोद्घातातील अ.क्र.४ पुढील शासन पत्रातील दिलेल्या निर्णयाप्रमाणे गाडगे महाराज मिशन यांना प्रदान करण्यात आलेले भूखंड "एच" आणि "ये" तसेच "जी" भूखंडापैकी गाडगे महाराज मिशन यांच्या ताब्यात असलेली ५५१ चौ.मी. जागा सोडून भूखंडातील उर्वरित जमीन त्यांच्याकडून पुनर्ग्रहित करण्यात येऊन शासन जमा करण्यात येत आहे.

स्वप्रतीवर मा.
जिल्हाधिकारी यांची
सही आहे.

सही/-
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करिता

प्रति,

मुख्याध्यापक,
श्री. गाडगे महाराज विद्यालय,
न्यू मिल रोड, कुर्ला, मुंबई ७०

---

प्रत: १) नगर भूमापन अधिकारी क्र.२ यांजकडे माहिती व अभिलेखांत नोंद घेण्यासाठी व दुरुस्त मिळकत पत्रिका पाठविण्यासाठी रवाना.
सदर प्रकरणी मोजणी नकाशा क्र.मो.र.न. २४१ दि. १०.५.८७ पहावा.
सदरील नकाशा आपल्या कार्यालयात उपलब्ध नसल्यास तो जिल्हा निरिक्षक भूमि अभिलेख, मु.उ.जि. यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावा.
२) जिल्हा निरिक्षक भूमि अभिलेख यांजकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
२. वरील नकाशा नगर भूमापन अधिकारी क्र.२ यांना दिला नसल्यास तो त्यांना त्वरीत देण्यात यावा.
३) तहसिलदार कुर्ला यांजकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.
२. संबंधीत गावच्या अभिलेखांत याबाबत नोंद घेऊन सुधारीत गा.न.नं. ७/१२ चे उतारे पाठवावेत.
४) आयुक्त, कोकण विभाग यांस माहितीसाठी सादर.
५) सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय यांस माहितीसाठी सादर.

स्वप्रतीवर मा.
जिल्हाधिकारी यांची सही आहे.

जिल्हाधिकारी, मु.उ.जि. करिता

मेघपू. १५२९२

(855)

शासन ज्ञापन, क्रमांक-एलएनडी-२६८५/१६६८९/प्र.क्र. १२१६/ज१

ws/413

9 OCT 2007

महसूल व वन विभाग,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक १ ऑक्टोबर, २००५

विषय- जमीन- मुंबई उपनगर जिल्हा

मौजे पूर्ला ता. पूर्ला, नभूक्र ५०३ पै व ५०६ पै मधील नावे नसलेल्या भूखंडावर श्री. गाडगे महाराज मिशन या संस्थेने घेतलेले अतिक्रमण नियमानुकूल करणेबाबत...

**शासन ज्ञापन :-**

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्रमांक-सी/कार्या-२/अे/२५/अे-५७६, दिनांक १८/१/२००१ च्या अनुषंगाने, विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, मौजे पूर्ला, नभूक्र ५०६ पै व नभूक्र ५०३ पै मधील मुंबई महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यात सेकंडरी स्कूल करीता आणि निवासी प्रयोजनाकरीता आरक्षित असलेल्या पुढील भूखंडावर श्री. गाडगे महाराज मिशन या संस्थेने, शैक्षणिक प्रयोजनासाठी अतिक्रमण घेले आहे :-

| अ.क्र. | न.भू.क्र. | भूखंड क्रमांक | विकास आराखड्याचे आरक्षण | अतिक्रमित क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|
| १ | ५०६ पै | डी पै | सेकंडरी स्कूल | २२४.२ |
| २ | ५०६ पै | इ पै | सेकंडरी स्कूल | ५२६.१ |
| ३ | ५०३ पै | जी | सेकंडरी स्कूल | ४५.६ |
| ४ | ५०३ पै | एच | सेकंडरी स्कूल | १२८.१ |
| ५ | ५०३ पै | आय | सेकंडरी स्कूल | ४१.५ |
| ६ | ५०३ पै | --- | निवासी विभाग | १८३.६ |
| ७ | ५०६ पै | --- | निवासी विभाग | १२ |
| ८ | नियोजित रस्त्याने बाधित असलेल्या जमिनीमधील | --- | विकास रस्ता | ५८०.९ |
| | | | एकूण अतिक्रमित क्षेत्र | १७५० चौ. मी. |

वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या एकूण १७५० चौ. मी. जमिनीमधील अतिक्रमित क्षेत्रापैकी नियोजित रस्त्याने बाधित असलेल्या ५८१ चौ. मी. क्षेत्र वजा जाता उर्वरित ११६९ चौ. मी. जमिनीवरील श्री. गाडगे महाराज मिशन या संस्थेने शैक्षणिक प्रयोजनासाठी घेतलेले अतिक्रमण महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम क्रमांक ४३ (अ) (दोन) (तीन) तरतुदीनुसार सदर जमिनीच्या सन २००५ च्या बाजारभावाच्या शिघ्रसिध्दगणकानुसार देणा-या दराप्रमाणे २ १/२ पट दंडनिय कब्जेहक्काची रक्कम आणि २ १/२ पट दंडनिय बिनशेत सा-याची रक्कम वसूल करुन तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ५०

C:\VILAS DHAULG R\62

Scanned by CamScanner

(२) मार्गदर्शक तरतुदीनुसार रुपये २०००/- इतका दंड वसूल करून नेहमीच्या अटी/शर्ती तसेच जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अटी/शर्तीवर तसेच खालील अतिरिक्त अटीवर अतिक्रमण नियमानुकूल करून देण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

अटी :- १) अतिक्रमण नियमानुकूल केलेल्या जागेचे हस्तांतर तसेच जमिनीचा वापर मंजूर प्रयोजनाव्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी किंवा इतर व्यापारी/वाणिज्यिक प्रयोजनासाठी शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय करता येणार नाही.

२. सदरचे आदेश नगर विकास विभाग, शालेय शिक्षण विभाग यांच्या सहमतीने तसेच वित्त विभागाकडील अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३९९/०५/व्यय-९, दिनांक २६/७/२००५ अन्वये दिलेल्या सहमतीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( वि. सि. वखारे )
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा
प्रशासकीय इमारत,
वांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

प्रतिलिपी :-

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२) जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, पुणे
३) उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई
४) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, मुंबई उपनगर जिल्हा.
५) महालेखापाल, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
७) नगर विकास विभाग, नवि-११, मंत्रालय, मुंबई
८) वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई.
९) शालेय शिक्षण विभाग/माशि-३, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) ज-३ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

VILAS DHADEO BAG

Scanned by CamScanner